संपादकीय

कवी ना. धों. महानोर

नाधोंची कविता असे करू शकली कारण ती जन्मली तीच मुळी शेतात. शेतमजुराच्या पोटी जन्मलेल्या नामदेवास जमीन कसतानाच कविता गवसली. धूळभरली. मातकट. मराठी सारस्वतांच्या अंगणात तिला स्थान मिळावे म्हणून नाधोंनी तिच्यावरची धूळ झटकली नाही की तिला नागर अंगडया-टोपडयात बसवले नाही. नाधोंच्या कवितेचे, आणि पर्यायाने आपण मराठी वाचकांचे, सुदैव असे की मुंबई-पुण्यालगतच्या प्रकाशकस्नेही वातावरणापासून दूर असूनही नाधोंच्या कवितेतल्या गंधाची दखल साहित्य व्यवहाराने घेतली. त्यातल्या नावीन्याचे, अस्सलतेचे रास्त कौतुक झाले आणि चित्रपटांच्या एरवी कामापुरतेच जवळ करणाऱ्या जगाने तिला दाद दिली. जैत रे जैतचा जन्म हा त्यातून झाला. या गाण्यातले काव्य अस्सल करकरीत आहे कारण आधी धून बांधून त्यावर शब्द बेतलेले नाहीत. मंगेशकर कुटुंबीय, डॉ. जब्बार पटेल अशा अनेकांच्या एकत्र बैठकीत त्यांना फक्त प्रसंग सांगितले गेले आणि नाधोंची कविता अ-नागर भावना अंगात माझिया भिनलाय ढोलिया म्हणत भर ज्वानीतली नार, अंग मोडीत चालते तशी बोलू लागली. आपल्याकडे एखाद्यास एकात कशात मोठे यश मिळाले की पाठोपाठ त्याच साच्यातल्या मूर्तीची मागणी जोमात होते. नाधोंच्या बाबतही ती झाली. तशी अन्य काही गाणी त्यांनी लिहिलीही. पण जैत रे जैतपेक्षा त्यांच्या कवितेस मोठे यश मिळाले ते माझ्या आजोळच्या गाणींनी. त्याआधीही मराठी लावणीत 'बुगडी माझी सांडली गं, अशी तक्रार केली गेली, 'तुझ्या उसाला लागल कोल्हा असा शाप दिला गेला, 'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा अशी मागणी केली गेली. पण नाधोंची लावणी 'राजसा जवळि जरा बसा असे सांगते आणि लताबाई ती गाताना ब आणि सा असे गातात की ती हाताला धरूनच खाली बसवते. 'त्या दिशी करूनि दिला विडा, टिचला माझा चुडा.. कहर भलताच हे मान्य करायला आणि सांगायलाही ती लाजत नाही. कवी म्हणून नाधों फार भाग्यवान. कारण अत्यंत योग्य टप्प्यावर पुलं, शरदराव पवार, गोविंदराव तळवलकर अशी साहित्य-संस्कृती व्यवहारात दबदबा असलेली एकापेक्षा एक मोठी व्यक्तिमत्त्वे त्यांच्याकडे आकृष्ट झाली. अशांतील शरदराव सोडले तर पुलं, गोविंदराव इत्यादींचा ग्रामीण जगण्याशी संबंध तसा कमीच. या सर्व महानुभावांचे पळसखेडला नाधोंकडे येणेजाणे जसजसे वाढले तसतशी मध्यमवर्गीय घरांत नाधोंच्या कवितेची ऊठबसही वाढली. मराठीतील नागरकेंद्री साहित्यव्यवहारास तोपर्यंत कथाकथनामुळे शंकर पाटील, त्यातही अधिक चिकित्सकांस रा. रं. बोराडे वगैरे मोजकेच साहित्यिक माहीत. कवितेत त्याआधी ग्रामीण भाग तसा कडेकडेनेच आलेला. त्यांची 'नुक्ते आले न्हाण, रानवाऱ्याला उधाण असे सांगणारी गोरे ऊन, पिसाट राघू, क्षितिजाचे डोळे, रातझडीचा पाऊस, अशी ऐंद्रीय अनुभवांनी, नाधोंचा शब्द वापरायाचा तर, लदबदलेली शब्दकळा काव्यप्रेमींवर नेहमीच गारूड होऊन राहिली. हे गारूड अखेपर्यंत होते आणि त्यांच्यानंतरही ते राहील. अशी हमी देता येते कारण साधारण - वर्षांपूर्वी लिहिलेल्या त्यांच्या रानातल्या कविता आजही वाचाव्याशा वाटतात. शहरीकरणाच्या रेटयात माणसांच्या आयुष्यातले रान जसजसे नामशेष होत जाईल तसतशी नाधोंच्या कवितेची मुळे आपल्या मनांत अधिकाधिक खोलवर रुजतील.

तुकोबांची अमृतवाणी भाग-१५२३

तुका म्हणें एकाएकीं वरासन
दुजें तेथें भिन्न अशुभ तें -१

पात्रता नसताना किंवा कष्ट करण्याची तयारी नसतांनाही अनेकांना एका रात्रीतुन किंवा तात्काळ मोठे व्हावे वाटत असते. त्याचबरोबर आपल्या अंगी योग्यता नसतांनाही एखाद्या पवित्र आसनावर किंवा सत्तेच्या खुर्चीवर जाउन बसणे योग्य नसते. आपण कष्टपुर्वक किंवा आपल्या योग्यतेप्रमाणे एखादे आसन, खुर्ची मिळवणे योग्य असते. हे जरी खरे असले तरीही अनेक लोक चुकीच्या पध्दतीने एखादे आसन मिळवतात. त्याचबरोबर अनेकवेळा उपलब्ध संधीचा दुरुपयोग करतात. अशी दुरुपयोग करण्याची वृत्ती केवळ राजकारणातच आहे असे नव्हे, तर ही वृत्ती काही प्रमाणात का होईना अध्यात्मीक क्षेत्रातही आहे. ज्या संत महात्म्यांच्या पवित्र आसनाचे पुजन केले जाते. त्याच आसनावर एकाएकी जाऊन बसणे म्हणजे अशोभनीय कृत्य होय. आपण संत महात्म्यांपेक्षा भिन्न असतांनाही किंवा संत महात्म्यांची पात्रता आपल्या अंगी नसतांनाही अशा पवित्र आसनावर बसणे म्हणजे वेडेपणा होय. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणें एकाएकीं वरासन दुजें तेथें भिन्न अशुभ तें असा वेडेपणा करणारे लोक समाजात आहेत.

जय जय राम कृष्ण हरी, पांडुरंग हरी.

-डॉ. विजयकुमार पं. फड
श्री माऊली निवास, श्री माऊलीनगर, जालना.
मो. नं. : ९४२२२१६४४८

पक्ष संघटना मजबूत करा-वामन कदम

कन्नड (प्रतिनिधी)- पक्ष संघटना मजबूत करा संपर्कप्रमुख वामन कदम यांनी कन्नड येथे केले कन्नड शहरातील आमदार उदयसिंग राजपूत यांच्या संपर्क कार्यालयात म लोक अधिकार समितीचे सदस्य तथा कन्नड सोयगाव विधानसभा चे संपर्कप्रमुख वामन कदम यांनी कन्नड शहर व तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक घेतली.या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना कदम म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्रभर सध्याला लोक अधिकार समितीचे सदस्य प्रत्येक मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांची नवीन टीम माननीय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पाठीमागे आम्ही उभे करीत आहे जुने व निष्ठावंत शिवसैनिक ज्यांचे मन कुठे दुखावले गेले असेल किंवा ते संपर्कात नसेल तर त्यांना प्रवाहात आणा असे आवाहन केले. यावेळी पक्ष निरीक्षक हेमंत कुमार लोखंडे म्हणाले की गाव पातळीवरती पदाधिकाऱ्यांनी जाऊन गाव तिथे शाखा करायलाच पाहिजे असे आवाहन श लोखंडे यांनी केले.पैठण विधानसभा चे संपर्क प्रमुख मंगेश दळवी मुंबईकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सदाशिव पाटील यांनी केले. सूत्रसंचालन तालुका प्रमुख संजय मोठे यांनी केले. या प्रसंगी सहकार आघाडीचे अशोक दाबके, महिला संघटक रूपाली मोहिते, गीताराम पवार, उप तालुका प्रमुख दिलीप मुट्ठे, विभाग प्रमुख विलास पवार, गोकुळ डहाके, गणेश नलावडे, नंदू बोडखे, उपशहर प्रमुख संजय शिंदे यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी तालुकाप्रमुख संजय मोठे, शहर प्रमुख डॉ सदाशिव पाटील, बाबासाहेब मोहिते, रूपाली मोहिते, अशोक दाबके, शंकर नवले, सतीश जिवरग, प्रमोद बागुल, रामराव राठोड, शेषराव हिवाळे, राहुल गायकवाड, कैलास निर्मळ, संजय घुगे, आबासाहेब थोरात, लक्ष्मण सूर्यवंशी, संदीप पंडित गट प्रमुख, शरद शिरसाट विभाग प्रमुख, गोटीराम शेजवळ, सोपान गोलाईत, उपशहर प्रमुख चंद्रकांत लाडे, शिवदूत सेनेचे सुरेश सुरेश, युवा सेना चे उमेश मोकासे, बाबासाहेब मोकासे, गंपू जाधव, अशोक मोकासे, शेख अक्रम, आसिफ शेख, जब्बार भाई, इत्यादी उपस्थित होते. आभार प्रदर्शन उप तालुका प्रमुख नवनाथ राठोड यांनी केले.

प्रत्येकाने आयुष्यमान हेल्थ कार्ड काढून घ्यावे - डॉ.राजपूत

सावळदबारा (प्रतिनिधी)- सावळदबारासह परिसरातील नागरिकांनी आयुष्यमान भारतचे डिजिटल हेल्थकार्ड, काढून घ्यावे असे आवाहन सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही .पी. राजपूत यांनी केले आहे.

सध्या आजारपणात प्रचंड खर्च होतो व अचानक उद्भवलेल्या कठीण प्रसंगात आर्थिक व मानसिक तणाव प्रचंड वाढतो. अचानक आलेल्या प्रसंगात नातेवाईक गोंधळून गेलेले असतात अश्या परिस्थितीत मागील उपचार बाबतीत माहिती देणे शक्य होत नाही. अशा प्रसंगी आभा हेल्थ कार्ड हे आपला खूप मोठा मित्र बनून सोबत उभा राहतो. आभा कार्डमुळे आपल्या मागील आजारा संबंधित माहिती ही डॉक्टरला मिळते यामुळे तात्काळ योग्य उपचारकरण्यासाठी मदत मिळते. आयुष्यमान भारत जन आरोग्ययोजना कार्ड हे सी एस सी सेंटर वरून ई- केवायसी करून काढता येते यासाठी ग्रामपंचायत आदीकडून योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना कार्ड काढुन घेता येते व याद्वारे कुटुंबासाठी पाच लाखा पर्यंतची मदत सरकार कडून मिळते. तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक रेशन कार्ड धारकानाही महात्मा फुले जण आरोग्य योजने अंतर्गत ही कुटुंबासाठी पाच लाखापर्यंतची मदत मिळते असेही डॉ राजपूत यांनी बोलताना सांगितले.

साजापूर जि.प.शाळेत युवा संवाद कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद महसूल विभागाच्या वतीने महसूल सप्ताह साजापूर येथील जि.प.शाळेत युवा संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी औरंगाबादचे नायब तहसीलदार प्रशांत देवडे,मंडळ अधिकारी अभिलाषा म्हस्के, जिल्हा परीषद सदस्य कलीम सय्यद, तलाठी भरत दुतोंडे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत पाटील, साजापूरचे सरपंच जनार्धन बनसोडे, उपसरपंच कैसर शेख, पंढरपूर केंद्रप्रमुख देविदास सूर्यवंशी, ग्रा. प. सदस्य जाफर शेख, किरण गंगावणे, मुक्तार शेख मुख्याध्यापक धनंजय नागमवाड, पोलिस पाटील रशीद पटेल, शहानूर शेख, शमीम शेख आदीची उपस्थिती होती. महसूल विभाग आणि पंचायत राज्याच्या विविध योजना, उपक्रम , शासकीय सेवांची माहिती देऊन जिल्हा परीषद शाळेतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व शिक्षक व कर्मचारी आदींनी परीश्रम घेतले.

गंगापुर तालुक्यातील २९ गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्या : आ.सतीश चव्हाण

महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह राबविण्यात येत आहे ,या सप्ताहात महसूल विभागाकडे ३१ गावांत स्मशानभूमी नसल्याचा प्रस्ताव देऊन स्मशानभूमिसाठी जागेची ही मागणी केलेली आहे.

सुहास वाघचौरे
गटविकास अधिकारी, गंगापूर

लासुरस्टेशन (प्रतिनिधी)- गंगापुर तालुक्यातील २९ गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागाच नसल्याने ग्राम स्थांना मयत व्यक्तीवर अंत्यविधी करण्यास अडचणी येत असून सदरील गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आ.सतीश चव्हाण यांनी गुरुवारी विशेष उल्लेखाव्दारे विधान परिषदेत केली.गंगापुर तालुक्यातील जामगांव,भेंडाळा,आसेगाव,कासोडा,तळपिंप्री, औरंगपूर ,शहापूर,पळसगाव,धनगरपट्टी,हनमंतगाव, सय्यदपूर,मंजिरी,मुरमी,रांजणगाव पोळ,आपेगाव,गळनिंब, सावखेडा,काटेपिंपळगांव,खडकनारळा,कायगाव,टाकळीवाडी, वाहेगांव,झोडेगांव,गुरुधानोरा,गोळेगांव,पेकळवाडी,बगडी, झोडेगाव,सिध्दपुर यांच्यासह आदीं गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागाच उपलब्ध नाहीत. विशेष करून पावसाळ्याच्या दिवसांमध्ये मोठ्या कसरतीने अंत्यसंस्कार पार पाडावे लागतात. गट विकास अधिकारी गंगापुर यांनी सदर २९ गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलपब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केला परंतु त्यावर अद्यापही काहीच कार्यवाही झाली नसल्याचे आ.सतीश चव्हाण यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच सदरील गावांना त्वरीत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी आग्रही मागणी आ.सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात केली आहे.

पैठण तहसील कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा

पैठण (प्रतिनिधी) - पैठण येथील तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी अस्तिकुमार पाण्डेय , उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महसूल सप्ताहाचे उदघाटन उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ यांनी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे उदघाटन करून कार्यक्रमाला सुरुवात केली . यावेळी तहसीलदार सारंग चव्हाण यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी आरोग्य शिबिरात उत्साहाने भाग घेतला. कार्यालयातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून यांच्यासह ४० महिला व ३० पुरुषांची नागरिक आरोग्य तपासणी करण्यात आली. महसूल दिनानिमित्त ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाच्या वतीने रक्तातील हिमोग्लोबिन, थायरॉईड, ॲनिमिया, कॅन्सर, डिटेक्शन यासह सोळा प्रकाराच्या चाचण्या करण्यात आल्या. युवा संवादामध्ये जिजामाता कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींची कार्यालयात भेट आयोजित करण्यात आली. दरम्यान तहसीलदार सारंग चव्हाण यांनी विद्यार्थिनींना कार्यालयाबाबत माहिती व मार्गदर्शन केले या महसूल सप्ताहाचा भाग म्हणून 'एक हात मदतीचा' यामध्ये पात्र लाभार्थ्यांना रेशन कार्ड वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचा भाग म्हणून तहसील कार्यालय व श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात आधार कार्ड दुरुस्ती अद्यावतीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. सदरील आधार केंद्रावर १५० आधार दुरुस्त करण्यात आले आहे. दि १ऑगस्ट २०२३ रोजी सुरू झालेल्या महसूल सप्ताह दिनांक ७ ऑगस्ट २०२३ पर्यंत साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ , तहसीलदार सारंग चव्हाण यांनी केले आहे.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर औरंगाबाद यांचे न्यायालयात

सिव्हिल एम. ए. क्र. ११८५/२०२३

अर्जदार : १. स्नेहा पि. संजय सराटे, २. अनुष्का पि. संजय सराटे ३. अनिकेत पि. संजय सराटे ४. कल्पना भ्र संजय सराटे ५. सुमनबाई भ्र. पांडुरंग सराटे

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, औरंगाबाद

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी ॲड. अत्तदीप आगळे औरंगाबाद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे कि, संजय पि. पांडुरंग सराटे यांचे दिनांक ३१/१०/२०२१ रोजी औरंगाबाद येथे निधन झालेले असून, त्यांच्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदारांनी मा. न्यायालयाकडे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. मयत संजय पि. पांडुरंग सराटे हे अर्जदार क्रं. १ ते ३ यांचे वडील, अर्जदार क्रं. ४ यांचे पती आणि अर्जदार क्रं. ५ यांचा मुलगा होते. त्याअर्थी या जाहीर प्रगटनानुसार सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, अर्जदारांच्या

विनंतीनुसार त्यांच्या हकात ते मयत संजय पि. पांडुरंग सराटे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मा. न्यायालयाकडून उदघोषणा आदेश व वारस प्रमाणपत्र मिळणेकामी ज्या कुणास कसल्याही प्रकारचा उजर, आक्षेप, हरकत असेल अशा व्यक्तींनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा तत्पूर्वी आपला उजर आक्षेप दाखल करावा. सदरील मुदतीनंतर अर्जदाराचा अर्ज विनंतीनुसार मंजूर झाल्यानंतर आलेला उजर ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय औरंगाबाद

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
आदेशावरून
न्यायालयीन अधिक्षक

अंभईत येथे महसूल दिन साजरा

अंभई (प्रतिनिधी)- सिल्लोड तालुक्यातील भई येथे महसुल दिन साजरा करण्यात आला. सप्ताह दिनानिमित्त न्यु हायस्कूल अंभई येथे युवा संवाद.पिपळगाव घाट येथे रस्ता मोकळा केला. फेरफार अदालत घेऊन अअदालती मधे विवीध प्रकारचे पंचे चाळीस फेरफार मंजुर करण्यात आले.या वेळी मंडळ अधिकारी आप्पा सोणवने,.तलाठी शंकर देवतुळे,सरपंच रामदास दुतोंडे, रईस देशमुख, पो.पाटिल दगडु मैद ग्रा.प.सदस्य.सद्दाम तडवी, मुख्याध्यापक कौतिक सपकाळ,विजय मागुळकर यांच्यासह नानेगाव.पिपळगाव घाट.बोजगाव.पागरी येथिल नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयातून औरंगाबाद

सिव्हील एम.ए.नं. ०००११८६/२०२३

अर्जदार : प्रिया नंदकिशोर पाऊलबुधे (प्रिया सुशांत वाघचौरे) वय ३१ वर्ष धंदा- गृहिणी रा. घर नं. ४-१८ -३४/पी प्लॉट नं.८. गजानन नगर गारखेडा औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार : १) महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हा अधिकारी औरंगाबाद. २) सुनंदा नंदकिशोर पाउलबुधे रा. वरील प्रमाणे ३) ज्योती अशोक गोरे रा. भक्ती निवास दादेगाव बु. औरंगाबाद (४) प्रसाद नंदकिशोर पाउलबुधे रा. फ्लॅट नं. ६६ गल्ली नं. ८ गजानन नगर गारखेडा औरंगाबाद.

विषय : सक्सेशन सर्टिफिकेट मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारानी मा. न्यायालयात ॲड. मुकेश रेंपनवाड, ॲड. सात्विक वाघचौरे, ॲड. राधिका पांडे, औरंगाबाद यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ यांचे वडील व गैरअर्जदार क्र. २ यांचे पती व गैरअर्जदार क्र. ३ व ४ यांचे वडील नामे नंदकिशार तुकाराम पाऊलबुधे यांचे दिनांक ०३/०६/२०२२ रोजी, औरंगाबाद येथे मयत झाले आहे. मयताच्या पश्चात अर्जदार क्र १ व गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाही शासकिय व निमशासकिय कामकाजा करीता अर्जदार यांचे नावे सक्सेशन मिळणे बाबत गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांची कोणतीही हरकत नसून त्याआर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ च्या नावे सक्सेशन सर्टिफिकेट देण्यास कोणास उजर, आक्षेप असेल त्यांनी जाहिर प्रगटन प्रसिद्धीपासून ३० (तीस) दिवसात मा. न्यायालयात नोंदवावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदार यांच्या नावे सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता आज दि. /०८/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/-
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरीत/-
न्यायालय अधिक्षक,
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर.औरंगाबाद

कोहिनूर महाविद्यालयात मतदार व अवयवदान बद्दल जनजागृती

खुलताबाद (प्रतिनिधी)- खुलताबाद स्थित कोहिनूर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खुलताबाद येथे अध्यक्ष डॉ. ड मो.मजहर खान व सचिव मा.अस्मा खान मॅडम यांच्या परवानगीने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व मतदार जागृती कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार व अवयवदान बद्दल जनजागृती हेतू व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जावेद तांबोळी यांनी केले. १८ वर्ष वय पूर्ण होत असलेल्या विद्यार्थ्यांना मतदान हा नागरिकाचा मूलभूत हक्क आहे, मतदार यादीत नाव नोंदणी तसेच लोकशाहीचे महत्त्व लोकप्रशासन विभागाचे प्रमुख प्रा.संदीप अवसरमोल यांनी विद्यार्थ्यांना समजाऊन सांगितले. तसेच भारतीय अवयवदान महोत्सवाचे औचित्य साधून प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तहसीन पठाण यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी अवयवदानाची प्रतिज्ञा घेतली. आभार प्रदर्शन डॉ. राखोंडे मुंजाजी यांनी केले.या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. हिवाळे मधुकर व डॉ. रफिउल्लाह खान, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.मोहम्मद हनीफ व डॉ. वैशाली अजने, डॉ.आरिफ शेख,डॉ. जिते सुभाष, प्रा.शेरखान पठाण, डॉ.चारुलता प्रधान व इतर सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क,
प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी
कोलकाता 700 091, जिल्हा 24-परगणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक ई-लिलावाद्वारे"** **"जिथे आहे जसे आहे तत्वावर"** आणि **"ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर"** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 02.08.2023 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. राहुल रामकृष्ण [illegible] 2. वैशाली [illegible] 3. आईसाहेब भोजनालय	मालमत्तेचा पत्ता: "साई विहार" नावाच्या इमारतीमध्ये फ्लॅट नं.10, 3रा मजला, ज्याचे बांधकाम केलेले क्षेत्रफळ आहे 42.51 चौरस मीटर्स, ह्या इमारतीच्या प्लॉटचे क्षेत्रफळ आहे 220.75 चौरस मीटर्स, एस.नं.20751/A आणि 184.87 चौरस मीटर्स, सीटीएस नं.20751/B, [illegible], [illegible], औरंगाबाद, महाराष्ट्र 431005 सीमारेषा: पूर्व - मोकळी जागा; पश्चिम - फ्लॅट नं 8; उत्तर - मोकळी जागा; दक्षिण - फ्लॅट नं 9	AURHL1800 0323 आणि AURHL1800 0326	28th एप्रिल, 2023	रु. 2,43,576/-	रु. 50,54,419.38/-	रु. 24,35,760/-	17/08/2023	22/08/2023

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायदा अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **"जशी आहे जिथे आहे तत्वावर"** आणि **"जशी आहे ज्या स्थितीत आहे"** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **21/08/2023** रोजी किंवा त्यापूर्वी [illegible] ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव [illegible] सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **22/08/2023** रोजी 18.00 पर्यंत किंवा [illegible] म्हणजे **23/08/2023** पर्यंत, [illegible] 75% रक्कम [illegible] एल&टी फायनान्स लिमिटेडला [illegible] दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे [illegible] **"नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक - 9823271111, ऑफिस: एल&टी फायनान्स लि.- ऑफिस नं. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे-411005 आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक - 8668943242, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, [illegible], सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098."** [illegible]
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी [illegible] कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) [illegible] सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता [illegible]

दिनांक: 05.08.2023
ठिकाण: औरंगाबाद

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

Printed at Anand nagari prakashan pvt. ltd. A/14, additional M.I.D.C., Jalna & published by Ravindra Mishrilal Bangad on behalf of Anand nagari prakashan pvt. ltd. at Jyotimarya Complex, Block no. 5 & 32 Jalna road, Aurangabad (Maharashtra). Tel.: (0240) 2483911, Fax: 2481910, Editor: Ravindra Mishrilal Bangad*. (*Responsible for selection of news under P & RB act.). Jalna 13th year. E-mail: anandnagri@gmail.com. (All desputes under Jalna jurisdiction). It is not necessary to the editorial board that they agree with the opinions expressed through matter and articles published in this newspaper. RNI no. MAHMAR/2012/26780.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक आणि संपादक रवींद्र मिश्रीलाल बांगड* यांनी आनंद नगरी प्रकाशन प्रा.लि. ए/१४, अॅडिशनल एम.आय.डी.सी., जालना येथे छापून कार्यालय ज्योतिर्मय कॉम्प्लेक्स गाळा क्रं. ५ व ३२ जालना रोड औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. फोन नं. ०२४०-२४८१८०९, २४८३९११ फॅक्स २४८१९१० औरंगाबाद वर्ष १३वे. (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे). ई मेल : anandnagri@gmail.com (सर्व वाद जालना न्यायालयाअंतर्गत) या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकूर व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. आरएनआय नं.एमएएचएमएआर/२०१२/२६७८०